# उपवनसंरक्षक वर्धा वनविभाग वर्धा

कार्यालयीन पत्ता :-सिव्हील लाईन,आंबेडकर चौक, वर्धा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक 07152-240170 फॉक्स क्रमांक 07152-251898

| का. पा. वि. चंद्रपूर | |
|---|---|
| का. अ | |
| उप. का. अ. | |
| लेखापाल | |
| प्र. लि. | |
| शाखा | |
| आवक क्र. | 8063 |
| दि. | 25/6/13 |

विषय-कोटगल बॅरेज ता.जि.गडचिरोली या योजनेच्या बांधकामाकरीता असलेल्या 62.68 हे. आर वन जमीनी करीता पर्यायी जमीन उपलब्ध करुन देण्यातबाबत.

क्रमांक-कक्ष-16/सर्व्हे/ 2486 /2013-14
वर्धा, दिनांक :- 20/6/13

प्रति,
जिल्हाधिकारी,
वर्धा

संदर्भ-1.जिल्हाधिकारी वर्धा यांचे कडील पत्र क्रमांक/कक्ष/अका/जमीन/कोटगल/कावि-347/13,दि.27/5/13
2. वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणी यांचे कडील पत्र कमांक/243,दि.25.06.2013

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कोटगल बॅरेज तालुका जिल्हा गडचिरोली या योजनेमध्ये बाधीत होत असलेल्या गडचिरोली जिल्हयातील 62.68 हेक्टर वनजमिनीच्या मोबदल्यात वनसंवर्धन अधिनियम 1980 अन्वये बाधित जमिनीच्या दुप्पट म्हणजेच 125.36 हेक्टर जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये कोटगल बॅरेज प्रकल्पाकरीता पर्यायी जमीन उपलब्ध करुन देता येऊ शकेल किंवा कसे ? या बाबत चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

मेंढी नाला प्रकल्प ता.सावली,जिल्हा चंद्रपुर येथे होता, सहा.अधिक्षक अभियंता, चंद्रपुर पाटबंधारे प्रकल्प मंडळ चंद्रपुर याचे कडील पत्र क्रमांक/जा.क./3094/प्रशा.1/सामान्य/2011 दिनांक 03.08.2011 अन्वये प्रशासकीय मान्यता व्यपगत झालेली असल्यामुळे प्रकल्प रद झालेला आहे असे या कार्यालयास कळविलेले आहे.

मेंढी नाला लघु प्रकल्पाकरीता 435.65 हेक्टर जमिन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, परंतु मेंढीनाला प्रकल्प असफल झाल्याकारणाने त्या प्रकरणातील उपलब्ध जमिनीपैकी 40.23 हैक्टरं जमिन पगडी गुडम प्रकल्पासाठी आपले आदेश क्रमांक/अका/जमीन/एनओसी/डब्लुएस/109/12,दि.17 मार्च 2012 अन्वये वळती करण्यात आलेली आहे. उर्वरित 395.42 हेक्टर जमिन शिल्लक आहे, शिल्लक 395.42 हे. जमिनीपैकी 125.36 हे. पर्यायी जमिन कोटगल बॅरेज प्रकल्पाकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये या कार्यालयास कळविलेले आहे.

त्याअनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणी यांना उपरोक्त नमुद प्रकल्पाकरीता मागणी केलेले क्षेत्र हे वनीकरणाचे व वनस्थापनेच्या दृष्टीने योग्य आहे काय याची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविलेले होते. वनपरिक्षेत्र अधिकारी, हिंगणी यांनी क्षेत्राची तपासणी करुन सदर क्षेत्र अतिक्रमण विरहित असल्याची खात्री केली आहे व 131.98 हे. क्षेत्र वनीकरणाचे दृष्टीने योग्य आहे असे संदर्भिय पत्र क्रमांक 2 अन्वये शिफारस केलेली असुन त्यास हे कार्यालय सहमत असुन सदरचे क्षेत्रापैकी 125.36 हे. क्षेत्र पर्यायी वनीकरणाकरीता उपलब्ध करुन देता येइल असे या कार्यालयाचे मत आहे.तरी सदरहु क्षेत्र वळती करण्याची कार्यवाही आपले स्तरावरुन करण्यात यावी हि विनंती.

सहपत्र-पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध क्षेत्राची यादी

उपवनसंरक्षक
वर्धा वनविभाग वर्धा

प्रतिलिपी-कार्यकारी अभियंता, चंद्रपुर लघु पाटबंधारे विभाग चंद्रपुर यांना माहिती व उचित कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

आ.क्र./ 3058 /प्रशा. 8/कोटगल बॅरेज/2013

E:/Survey Section/General LETTER 2

कार्यालय, ल.पा. वि. चंद्रपूर 57
दि. 23/6/2013

प्रतिलिपी :- उ.वि.अ. उपसा सिंचन उपविभाग क्र. 1 चंद्रपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
सहपत्र - वरीलप्रमाणे.

कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग

Scanned by CamScanner